संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सिएटच्या आगीतून संशयाचा धूर

अजून उन्हाळा सुरू व्हायला बराच अवघी असताना मुंबईत आगी लागायला सुरुवात झाली आहे. एकापाठोपाठ आगी लागण्याचे किंवा लावण्याचे प्रकार पाहिल्यानंतर उन्हाळा जवळ आला की काय? असेही वाटायला लागते. चार दिवसांपूर्वी मुलुंड परिसरातल्या शांग्रिला कंपनीत अशीच संध्याकाळच्या वेळेत आग लागली आणि आता नाहूर स्टेशनच्या लगत असलेल्या प्रसिद्ध सिएट कंपनीच्या गोदामालाही तशीच संध्याकाळच्या वेळात आग लागली. एकापाठोपाठ या आगी लागतात त्यावेळी त्यातून संशयाचे धूर बाहेर पडतात. सिएट कंपनीबाबत असेच प्रश्नचिन्ह निर्माण होते. किमान ३०-४० वर्षे भांडूप भागात असलेली सिएट ही एक प्रतिष्ठित कंपनी आहे. संपूर्ण देशातल्या वेगवेगळ्या वाहनांना दर्जेदार टायर्स पुरविण्याचे काम सिएटतर्फे केले जाते. कंपनीचा कारभार तसा उत्तम असल्याने देशभर तिचा नावलौकीकही टिकून राहिला. आता मात्र जेव्हा एवढ्या मोठ्या कंपनीच्या गोदामाला प्रचंड आग लागते आणि कोट्यवधींचे नुकसान होते. त्यावेळी साहाजिकच काही प्रश्न निर्माण होतात. ज्या पद्धतीने ही आग लागली आणि आकाशात आगीबरोबर धुराचे मोठे लोळ फेकले जात होते. कंपनीचे उत्पादन मर्यादित स्वरूपात असल्याने नुकसानही मर्यादित झाले. जर कंपनी पूर्ण क्षमतेने कार्यरत असती तर अधिक नुकसान झाले असते. शिवाय शेजारच्या अनेक इमारतींना त्याची झळ पोहोचली असती. लगतच्या नाहूर स्टेशनात हजारो प्रवाशांची वर्दळ असल्याने आणखीनच मोठे संकट ओढवले असते. सुदैवाने ती वेळ आली नाही. आता नेहमीप्रमाणे आगीची ठरावीक दोन कारणे सांगितली जातात. त्यात शॉटसर्किट किंवा केमिकलमुळे ती लागल्याचे सांगितले जाईल. परंतु आतापर्यंत मुंबईत ज्या ज्या मोठ्या आगी लागतात आणि त्यांची कारणे जशी गुलदस्त्यात राहिली तसेच आगीचे खरे कारणही कधीच पुढे येणार नाही. गेल्या दहा-पंधरा वर्षांत मुंबईत मोक्याच्या जागी असलेल्या झोपडपट्ट्यांना, गिरण्यांना, कंपन्यांना आगी लागण्याचे प्रकार घडत आहेत. तो एक योजनाबद्ध कारस्थानाचा भाग बनत चालला आहे. आगीमुळे या जागा किंवा भूखंड मोकळे करायचे आणि त्याठिकाणी मोठे-मोठे टॉवर्स, मॉल किंवा टाऊनशीप उभ्या राहताना दिसत आहेत. म्हणूनच मुंबईतल्या आगीमागे इथल्या जागांना, भूखंडांना मिळत असलेल्या वाढत्या मागणीचे आणि किमतीचे मोठे कारण आहे, ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. सध्या सिएट कंपनीतून होणारे उत्पादन बरेच कमी झाले होते. ३० वर्षांपूर्वी इथे शंभर टक्के उत्पादन होते. त्याच्या तुलनेत २५ टक्केही उत्पादन होत नाही. काही वर्षांपूर्वी कंपनीने आपल्या काही जागेचा वापर गृहनिर्मितीसाठी करून घेतला. आता या २५ टक्के उत्पादनातील नफ्यापेक्षा जागेच्या व्यावसायिक वापरातून त्यापेक्षा दहापट नफा मिळू शकतो, अशी परिस्थिती असल्याने आज नाही तर आणखी पाच वर्षांत कंपनीने आपला गाशा गुंडाळला असता. परंतु एक नावलौकीक कंपनी आगीचे निमित्त होऊन बंद पडते तेव्हा संशयाचे वातावरण निर्माण होते.

### कंपन्यांच्या जागांवर मॉल

गेल्या वीस वर्षांत मुंबईच्या विक्रोळीपासून थेट भांडुप-मुलुंड ठाण्यापर्यंतच्या औद्योगिक पट्ट्यात अक्षरश: शेकडो कंपन्या बंद पडल्या. विक्रोळीपासून एलबीएस रोड लगत अनेक मान्यताप्राप्त कंपन्या मोठ्या झोकात सुरू होत्या. लाखो कामगारांच्या रोजी-रोटीचे त्या माध्यम होत्या. कामगारांनीदेखील जीव ओतून काम केल्याने या कंपन्या नफ्यामध्ये चालत होत्या. रॅलीवुल्फ, हेकस्ट, बरोडा वेलकम, जीकेडब्ल्यू सीबा गायत्री, मे अॅण्ड बेकर, ड्यूक अशा अनेक मोठ्या कंपन्या या भागात होत्या. परंतु वेगवेगळी कारणे पुढे करून त्या बंद पाडल्या. सीबा गायत्री, टेकस्ट या कंपन्या देशभर आपली प्रतिभा निर्माण करून होत्या. आज त्याच टेकस्ट कंपनीच्या जागेवर जंगी मॉल उभा राहिला आहे. या परिसरात जेवढे काही मॉल दिसतात ते सगळे बंद पडलेल्या कंपन्यांच्या जागेवर उभे राहिले आहेत. तो प्रकार अजूनही सुरूच आहे. मुंबईतल्या जागांना आज तर सोन्याच्या भावापेक्षा दसपट जास्त किंमत आली आहे. परळ, लालबाग, नायगाव भागातल्या अनेक गिरण्या अशाच पध्दतीने बंद पाडल्या गेल्या. तिथे आंतरराष्ट्रीय आणि भारतीय कंपन्यांची मोठमोठी कॉर्पोरेट ऑफिसेस उभी राहिली आहेत. त्या कंपन्यातल्या कामगारांना देशोधडीला लावायचे. त्यांची पूर्ण श्रमाची किंमतही द्यायची नाही पण जागांचे सौदे करून अब्जावधी रुपये लाटण्याचे प्रकार शासन मान्यतेने होऊ लागले आहेत. अशा जागेच्या मोहापोटी, सरकारी सवलत, ज्यादा एफएसआय या लाभापोटी तर सिएटमध्ये आग लागली नाही ना, असा तितकाच ज्वलंत प्रश्न निर्माण होतो.

### मुंबई धनदांडग्यांच्या मुठीत

आता तर मुंबईचे स्वरूप वेगाने बदलते आहे. मोनो रेल, मेट्रो किंवा दर्जेदार आंतरराष्ट्रीय विमानतळांनी मुंबईची प्रतिमा बदलते आहे. आधीच जागेची टंचाई असलेल्या या महानगरात भविष्य काळात काय परिस्थिती असेल हे सांगता येत नसले तरी ही मुंबई धनधांडगे काबीज करतील यात काहीही शंका उरलेली नाही दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ नव्या मुंबईत होत आहे. पश्चिम उपनगरातून कांजूर, नाहूर, मार्गाने ऐरोली ब्रीजवरून थेट पनवेल गाठता येते. हा शॉर्टकर्ट पैसे मिळविण्याचाही शॉर्टकट ठरणार आहे आणि म्हणूनच कांजूरमार्ग सारख्या उपनगराकडे २० वर्षांपूर्वी कोणाचेही फारसे लक्ष नव्हते. आज तिथल्या जागांच्या किमती कुठच्या कुठे गेल्या आहेत. सिएट कंपनीची जागा या भागात अशीच मोक्याची जागा आहे. पुढच्या पाच दहा वर्षांत त्याच ठिकाणी मोठे-मोठे टॉवर्स उभे राहिले तर आश्चर्य वाटण्याची गरज नाही. सरकारतर्फे मोठ्या टाऊनशिपना जादा एफएसआय दिला जातोय. मोठ्या कंपन्यांकडे भांडवलदारांकडे असलेल्या जागांचा विकास त्यांना करता यावा म्हणून सरकार आपली धोरणे बदलत आहे. सामान्य माणसाला स्वस्त घर मिळाले. यापेक्षा हा सामान्य माणूस स्वस्त दरात मुंबईतून कसा हद्दपार होईल अशीच सगळी कारस्थाने होत आहेत. त्याचा विचार केल्यावर सिएट कंपनीची आग हा केवळ एक अपघात होता असे म्हणणे कठीण जाते. एवढी मोठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेली कंपनी आग विझविण्यात अयशस्वी होते. अशा मोठ्या कंपन्यात स्वत:च्या अग्निशमन यंत्रणा असतात जेव्हा एवढी मोठी आग लागली तेव्हा ही यंत्रणा काय झोपा काढीत होती का, असा प्रश्न निर्माण होतो. आग लागायला कोणतेही कारण पुरते. परंतु, त्या विझविताना अनेक प्रश्न निर्माण होतात. सिएट कंपनीने असेच प्रश्न निर्माण केले आहेत. मुंबईत सध्या लाखो एकराचे भूखंड मोकळे करून घेण्याच्या योजना व्यवस्थिपणे राबवल्या जात आहेत. त्याचा फायदा मूठभर लोक व्यवस्थितपणे करून घेत आहेत. आतापर्यंत आगीच्या भक्ष्यस्थानी अनेक कंपन्या पडल्या, यात आणखी एकाची भर पडली आहे. आता कंपनीचे कामकाज कितपत पूर्ववत सुरू होईल. याबाबत शंका अनेकांच्या मते कंपनी सुरू असून बंद पडल्यासारखीच होती. म्हणजे या प्रश्नातच उत्तर दडलेले दिसते.